दि. 20 जानेवारी,2014

# लोकपालांची नियुक्ती कोण करत आहे.

-अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

लोकपाल आणि लोकायुक्त अधिनियमाला 2013 मध्ये पारित करण्यात आले. जानेवारी 2014 च्या सुरुवातीस राष्ट्रपतींची स्वीकृती सुद्धा मिळाली आणि त्याला अधिसूचित करण्यात आले. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने लोकपाल अध्यक्ष आणि सदस्य यांची पदे भरण्यासाठी एक लांबलचक जाहिरात सुद्धा दिली. जाहिरातीसह निवेदन पत्रात नियम आणि पात्रतेच्या अटी सुद्धा दिल्या गेल्या.

ही प्रक्रिया कोणी सुरु केली? जाहिरातीला पाहून स्पष्ट आहे की कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने या पूर्ण प्रक्रियेला सुरु केले आहे आणि पदांसाठी अर्ज मागविली आहेत. संसदेच्या दोन्ही सदनात पारित अधिनियमाचा अभ्यास केल्यास असे समजते की, अशाप्रकारचे अर्ज मागविण्याचा कोणताच अधिकार नाही आहे.

अधिनियम धारा 4 लोकपालांच्या नियुक्ती संदर्भात आहे. यासाठी एक निवड समिती आहे, ज्यात पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, लोकसभेतील विरोधी पक्षनेते, भारताचे मुख्य न्यायाधीश किंवा त्यांच्याद्वारे मनोनीत न्यायाधीश आणि अन्य चार सदस्या यांच्या द्वारे नियुक्त एक प्रतिष्ठित विधिवेत्ता शामिल असेल.

वास्तवात आतापर्यंत निवड समितीच्या चार सदस्यांची कोणतीही बैठक झाली नाही. पहिल्यांदा या चार सदस्यांना बैठक घेऊन पाचव्या सदस्याच्या नियुक्तीसाठी नावांवर विचार करावा लागणार आहे. पाच सदस्यांच्या नियुक्ती नंतर निवड समिती लोकपालांच्या सदस्यांचे पॅनेल तयार करण्यासाठी एक चौकशी समिती स्थापन करील. चौकशी समितीत कमीत कमी 7 सदस्य असले पाहिजेत जे विभिन्न क्षेत्राशी जोडले गेलेले असतील. ही चौकशी समिती अध्यक्ष आणि लोकपाल यांच्या सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी योग्य लोकांचा तपास करील.

धारा 4(4) मध्ये सांगितले गेले आहे की चौकशी समिती लोकपालाचे अध्यक्ष आणि सदस्यांची निवड करण्यासाठी पारदर्शी प्रक्रिया अवलंबेल. चौकशी समितीकडून सिफारीश करण्यात आलेल्या लोकांमधून, निवड समिती नियुक्ती करण्यासाठी लोकांची शिफारस करील. तीला, चौकशी समिती द्वारे सिफारिश केलेल्या लोकांविषयी विचार करण्याचा अधिकार आहे. नियुक्त करण्यात आलेल्या आठ व्यक्तिंमधून चार न्यायिक पार्श्वभूमीचे लोक असले पाहिजेत. याचे अध्यक्ष भारताचे मुख्य न्यायाधीश अथवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होऊ शकतात.

आतापर्यंत निवड समितीची स्थापना करण्यात आलेली नाही. साहजिक आहे की कोणतीही चौकशी समिती नाही आहे. निवड समितीने ती प्रक्रिया सुद्धा तयार केली नसेल ज्याच्या अंतर्गत ती लोकपालचे सदस्य आणि अध्यक्ष यांची नियक्ती करिल. अशाप्रकारचे प्रतिष्ठित पदासाठी जिथे भारताचे माजी न्यायाधीश अथवा सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यांसारखी व्यक्ती आसनस्थ होईल, अर्ज करण्याची गरजच नाही कारण नियुक्तीचे काम फार छोटे आहे. कोणत्याही प्रकार याचा निर्णय निवड समिती करील कीं, जाहीरात द्यायची आहे किंवा अन्य प्रकारे निवड करायची आहे. यात सरकारची कोणतीही भुमिका नाही आहे.

असे होताना देखील, कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने निवड समितीचे अधिकार हडपले आहेत, जिची स्थापना करणे अजून बाकी आहे. त्यांना या पदांसाठी अर्ज मागविले असून जाहीरात दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे वर्तमान किंवा सेवानिवृत्त न्यायाधीशांची सेवानिवृत्ती झाल्यानंतर या पदासाठी अर्ज मागविण्याचा अविचारीपणा त्या पदाच्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध आहे, जी प्रतिष्ठा त्यांनी अजून राखून ठेवली आहे. सेवानिवृत्त न्यायाधीश जे आपला सीवी घेऊन संस्थानासोबत लॉबी करतील त्यांना

आत्मसन्मान आणि प्रतिष्ठा आहे. असे होऊ शकते की, लोकपालाच्या सदस्याच्या रुपात काम स्वीकारण्याची इच्छा ठेवणारे न्यायाधीश सर्वश्रेष्ठ व्यक्ती नसू शकेल. केंद्र सरकारकडे याचा अधिकार नाही. यासंदर्भात दिलेली जाहीरात अधिनियमाच्या प्रावधानांच्या विपरित आहे. मी पदासाठी मनोनीत निवड समितीच्या चारही सदस्य पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, भारताचे मुख्य न्यायाधीश आणि लोकसभा विरोधी पक्षनेते यांना पत्र लिहिणार की, त्यांचे काम कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने हडपले आहे. या बेकायदेशीर जाहिरातीला परत घेण्याची गरज आहे.